Dr. Chavan sir

ISSN 2454-3292

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# INDO WESTERN RESEARCH JOURNAL

(UGC Approved, Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year - VI, Issue - XI, Vol.- II

Impact Factor 6.10 (GRIFI)

Sept. 2019 To Feb. 2020

EDITOR IN CHIEF

**Prof. Dnyanraja Chighalikar**

INDO ASIAN PUBLICATION

I/C Principal
Art's, Commerce & Science Mahavidyalaya
Gadhinglaj, Dist. Kolhapur

IMPACT FACTOR 6.10

ISSN 2454-3292

International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for All Subjects

INDO ASIAN PUBLICATION

# INDO WESTERN RESEARCH JOURNAL

UGC APPROVED, REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XI, Vol. II

Year- VI, Bi-Annual (Half Yearly)

(Sept. 2019 To Feb. 2020)

Editorial Office :
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

Website
www.irasg.com

Contact : - 02382 - 241913
09423346913 / 09637935252
09503814000 / 07276301000

E-mail :
visiongroup1994@gmail.com
interlinkresearch@rediffmail.com
mbkamble2010@gmail.com

Published by :
Indo Asian Publication,
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

Price : ₹ 200/-

EDITOR IN CHIEF

Prof. Dnyanraja Chighalikar
Head, Dept. of Economics, A. C. S.Mahavidyalaya,
Gadhinglaj, Dist. Kolhapur (M.S.) India

EXECUTIVE EDITORS

Prof. Swyamprabha Sarmagdum
A. C. S.Mahavidyalaya,
Gadhinglaj, Dist. Kolhapur (M.S.) India

Prof. Sanjivini Patil
A. C. S.Mahavidyalaya,
Gadhinglaj, Dist. Kolhapur (M.S.)
India

DEPUTY EDITOR

DProf. Dharmvir Kshirsagar
A. C. S.Mahavidyalaya,
Gadhinglaj, Dist. Kolhapur (M.S.)
India

Prof. Samir Kulkarni
A. C. S.Mahavidyalaya,
Gadhinglaj, Dist. Kolhapur (M.S.) India

CO - EDITOR

Vanita Jadhav
Mother Terasa B.Ed. College,
Dharwad, Dist. Dharwad
(Karnataka)

Dr. B. S. Thombare
Head, Dept. of Geography,
Babaji Date Colletge,
Yavatmal, Dist. Yavatmal (M.S.)

MEMBER OF EDITORIAL BOARD

Dr. Mohmmad T. Rahaman
Dept. of Biomedical Science,
International Islamic University,
Mahkota (Malasiya)

Dr. Sivappa Rasapall
Dept. of Chemistry & Biochemistry,
UMASS, Wesport Road,
Dartmouth, MA (U.S.A.)

Dr.Eknath J. Helge
Head, Dept. of Commerce,
Jijamata Mahavidyalaya,
Buldhana, Dist. Buldhana (M.S.)

Dr.Sarjerao R. Shinde
Principal
B. K. D. College,
Chakur, Dist. Latur ( M.S. )

Dr.Satyenkumar P. Sitapara
Principal
Commerce & BBA College,
Amreli, Dist. Amreli (Gujrat)

Dr. Ambuja Malkhedkar
Gulbarga, Dist. Gulbarba
(Karnataka)

Dr. Allabaksha Jamadar
Head, Dept. of Hindi,
B. K. D. College,
Chakur, Dist. Latur ( M.S. )

Dr. Sakharam V. Kakade
Dept. of Zoology,
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

I/C Principal
Art's, Commerce & S... Mahavidyalaya
Gadhinglaj, ...

IAP
Issue : XI, Vol. II
I W R J
IMPACT FACTOR
6.10
ISSN 2454-3292
Sept. 2019 To Feb. 2020

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | भारतीय बँकिंग क्षेत्रातील सुधारणा आणि आव्हाणे<br>**डॉ. के.पी. वाघमारे** | 1 |
| 2 | भारतातील शेतमाल किंमत धोरण : एक दृष्टिक्षेप<br>**डॉ. अनिलकूमार कृष्णराव वावरे, किशोर सुतार** | 5 |
| 3 | जलयुक्त शिवार अभियान आणि महाराष्ट्र शासनाची भूमिका<br>**डॉ. जी.जी. गायकवाड** | 10 |
| 4 | कृषी पर्यटन आणि ग्रामीण विकास<br>**डॉ. एम.आर. खोत** | 14 |
| 5 | जागतिक भात उत्पादन स्थितीचा अभ्यास<br>**संभाजी शिवाजी सावंत** | 18 |
| 6 | आरोग्यदायिनी - सुजाता रायकर<br>**डॉ. संगीता संपत पाटील** | 21 |
| 7 | २१ व्या शतकामधील सामाजिक समस्या व उपाय<br>**डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई** | 25 |
| 8 | शहरी भागातील नोकरदार स्त्रियांच्या समस्या व उपाय<br>**अर्चना माने-केसरकर** | 32 |
| 9 | आजची बदलती जीवनशैली आणि मधुमेह<br>**दिपाली विजय पाटील** | 36 |
| 10 | चांदी कारखानदार (उद्योजक) असोसिएशन, हुपरी : ऐतिहासिक आढावा<br>**डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले** | 42 |
| 11 | ऐतिहासिक बाणूरगड : एक अभ्यास<br>**डॉ. आर. डी. निकम** | 46 |
| 12 | नरसिंगराव भु. पाटील यांचे सामाजिक कार्यातील योगदान<br>**डॉ. एम. एस. कोळसेकर** | 49 |
| 13 | गडहिंग्लजचे नगराध्यक्ष एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप (१९४३ ते २०००)<br>**डॉ. सुरेश मारूती चव्हाण** | 54 |

**Indo Western Research Journal (IWRJ)** (54)

IMPACT FACTOR
6.10

ISSN 2454-3292

Indo Western Research Journal (IWRJ)
Issue : XI, Vol. : II
Sept. 2019 To Feb. 2020
www.irasg.com

**Research Paper** **13** **History**

# गडहिंग्लजचे नगराध्यक्ष एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप (1943 ते 2000)

**डॉ. सुरेश मारुती चव्हाण**
इतिहास विभाग प्रमुख,
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

प्रस्तावना :

कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज तालुक्याला सर्वार्थाने जागरूक व समश्ध्द तालुका म्हणून आळखले जाते. सुमारे नव्वद गावांचा समावेश असणाऱ्या या तालुक्याला समाजप्रबोधना बरोबरच प्रत्यक्ष कश्तीतून समाज सुधारणेची प्रदिर्घ परंपरा लाभलेली आहे. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कशतिक व आर्थिक प्रगतीही अतिशय गंतीने झाल्याचे दिसून येते. शिवाय ही भूमी ऐतिहासिक वारसा सांगणारी, पुरोगामी विचारांची, कश्तीशील व्यक्तीमत्वांची आणि शूरवीरांची म्हणूनही ओळखली जाते. सुंदर निसर्ग, स्वच्छ हवामान, हिरण्यकेशी नदी, ऐतिहासीक सामानगड, गुड्डाईचा डोंगर, मंदिरे, कारखाने आणि शैक्षणिक संकुले यासारखी अनेक वैशिष्टये या नगरीची सांगता येतील.

इतिहास गडहिंग्लज नगरपरिषदेचा :

ब्रिटीश काळात प्रशासनातील लोकांचा सहभाग वाढावा म्हणून मोठया शहरातून नगरपरिषदांची स्थापना करण्यात येत होती. पुढे कालांतराने ज्या गावांची लोकसंख्या २००० इतकी असेल तिथेही नगरपरिषदांची स्थापना होवू लागली. पुरोगामी वारसा सांगणाऱ्या कोल्हापूर संस्थानानेही आपल्या राज्यातील अशा गावात नगरपरिषदा स्थापन करून लोकशाही विकासाची प्रक्रिया सुरू केली. त्याचाच एक भाग म्हणून गडहिंग्लजची लोकसंख्या २००० इतकी असल्यामुळे इ. स. १८८७ रोजी गडहिंग्लज टाऊन नगरपरिषदेची स्थापना करण्यात आली. त्याबाबतचा ठराव मोडी लीपीत करण्यात आला होता. गडहिंग्लज नगरपालिकेच्या स्थापनेपासून म्हणजेच १८८७ पासून ते १९२७ पर्यंत सर्व नगरसेवक सरकार नियुक्त होते. त्यातही कांही शसकीय अधिकारी व कांही स्थानिक प्रतिष्ठीत नागरीक यांचा समावेश असून त्यांना कमिशनर असे संबोधले जात असत. पुढे १९२७ पासून प्रत्येक वार्डातून २ याप्रमाणे

शहराच्या ४ वार्डातून ८ सभासद निवडून तर ८ सभासद सरकारतर्फे नेमण्यात येवू लागले. शिवाय १९२७ पासूनच नगरपालिकेला आपला अध्यक्ष नेमण्याचाही अधिकार मिळाला. त्यानुसार तत्कालीन बॉडीने १९२७ मध्ये कासमअली हकीम (मामलेदार पेठा गडहिंग्लज) यांची पहिले अध्यक्ष म्हणून निवड केली.

**गडहिंग्लजचे नगराध्यक्ष व त्यांचा कार्यकाळ :**

१८८७ मध्ये स्थापन झालेल्या गडहिंग्लज नगरपालिकेला १९४३ पासून कर्तबगार लोकनियुक्त नगराध्यक्षांची परंपरा लाभली आहे ती पुढीलप्रमाणे.

**१) डॉ. ए. बी. गुणे : (१९४३ ते १९४६)**

डॉ. ए. बी. गुणे हेच नगरपालिकेचे पहिले सरकार बाहय अध्यक्ष म्हणजेच पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष बनले. १९०९ रोजी अमळनेर येथे जन्मलेल्या गुणेंनी १९३१ मध्ये वैद्यकिय शिक्षण घेवून १९३२ पासून गडहिंग्लजला वैद्यकिय सेवा सुरू करून श्रेष्ठ धन्वंतरी म्हणून त्यांनी रूग्णांच्या मनामध्ये नवा विश्वास व चैतन्य निर्माण केले.

**२) श्री. एस. एन. घुगरे : (१९४६ ते १९५२)**

१९३७ पासूनच ते नगरपालिकेचे सदस्य असले तरी त्यांना १९४६ मध्ये नगराध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाली. कडक शिस्तीचे, खुल्या मनाचे व प्रामाणिक नागरीक हीच त्यांची प्रथम ओळख होती. एका बाजूला पालिकेचे उत्पन्न तुटपुंजे होते तर दुसऱ्या बाजूल सरकारी अधिकारी पालिकेच्या इमारतींचा स्वतःच्या निवासस्थानासाठी वापर करत असत. त्यामुळे ते थांबवण्याचे कठीण व कठोर कार्य त्यांनी केले.

**३) श्री. शंकरराव हिडदुगी : ( १९५२ ते १९५३)**

बोलण्यापेक्षा कृतीवर जास्त भर देणारे व व्यापारी व्यवसायात रममान होणारे शंकरराव हिडदुगी १९४८ ते ५६ पर्यंत मार्केट कमिटीचे सरकार नियुक्त सदस्य म्हणून कार्यरत होते.

**४) श्री. आर. वाय. देशपांडे : (१९५३ ते १९५६)**

एक लोकप्रिय वकिल म्हणूनच ते सर्वांना परिचीत होते. शांत, संयमी व कामात व्यस्त राहनेही त्यांची स्वभाव वैशिष्टये. जकात सुरू केल्याशिवाय या नगरिच्या विकासाची चाके फिरणार नाहीत म्हणून त्यांनी अनेक वर्षे कागदोपत्री आडकून पडलेला जकातीचा प्रश्न सोडवून पालिकेच्या विकासाची दारे खुली केली.

**५) डॉ. एस. एस. मोळदी : (१९५६ ते १९५९)**

विदयार्थी दशेपासूनच अत्यंत हुशार असणाऱ्या मोळदी साहेबांनी लंडन मध्ये शिक्षण घेवून भारताबरोबरच लंडनमध्येही वैद्यकिय कामाचा अनुभव घेतला. त्यांच्या योगदाना मुळेच त्यांना इंग्लंडमध्ये शल्यचिकित्साचे पारितोषिक देवून गौरवण्यात आले. पुढे गडहिंग्लजकरांची वैद्यकिय सेवा करत असताना त्यांना नगराध्यक्ष होण्याची संधी मिळाली. त्यांनी पाणी पुरवठयाचा प्रश्न मार्गी लावण्या बरोबरच टाऊन प्लानिंग नं. १ ची सुरूवात करून योजनाबध्द विकासाची मुहुर्तमेढ रोवली.

६) श्री. एम. जी. मुजूमदार : ( १९५९ ते १९६०)

वकिली व्यवसाय करणाऱ्या मुजूमदारांनी आपल्या कर्तुत्वाच्या जोरावर जिल्हा न्यायाधिशापर्यंत मजल मारली. शिवाय निवशतीनंतर सेंट्रल ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ट्रायस्युनल सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले. आपल्या नगराध्यपदाच्या कालावधीत वीज पुरवठयाबरोबरच बाजारपेठांच्या रूंदीकरण व लायब्ररीचे पालिकेकडे स्थलांतर यासारखी महत्वपूर्ण कामे केली. शिवाय कठीण प्रसंगी मध्यस्थी म्हणून काम करण्याची त्यांची पध्दत वाखानण्याजोगी होती.

७) डॉ. एस. एस. घाळी : (१९६० ते १९८१)

घाळीसाहेब उत्तम डॉक्टर व मार्गदर्शकही होते. कॉंग्रेसच्या सामान्य कार्यकर्त्यापासून ते आमदार व जिल्हा कॉंग्रेसच्या अध्यक्षपदापर्यंत त्यांनी विविध पदावर उत्तम काम पाहिले होते.

८) श्री. भिकाजी मोहिते : (१९८५ ते १९८६)

सार्वजनिक कामाबरोबरच संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सक्रिय सहभाग, शोषण व प्रस्थापित मक्तेदारीच्या विरूध्द संघर्ष हेच त्यांचे जीवनसुत्र होते. सामान्यातील असामान्य कार्यकर्ता असेच त्यांचे वर्णन केले जाते. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, बेघर—डोंबारी पूनर्वसन, दुष्काळग्रस्तांचे पूनर्वसन, जनता खुले नाटयगृह, रूग्णवाहिका खरेदी, मागासवर्गीय विदयार्थी वसतीगृह, बालवाडयांचा प्रारंभ ही त्यांच्या कामाची बोलकी उदाहरणे होत.

९) श्री. ज. र. पेडणेकर : (१९८६ ते १९८७)

समाजवादी पक्षाचे निष्ठावंत व क्रियाशील कार्यकर्ते असलेले दादा पेडणेकर हे थैलीला कधी शरण गेले नाहीत. १९५२ पासूनच ते नगरपालिकेच्या कामकाजाशी निगडीत होते. नगरसेवक पदाबरोबरच त्यांनी कामगार संघटनेचे अध्यक्ष म्हणूनही काम पाहिले. महागाई व आनीबाणीच्या विरोधात झालेल्या आंदोलनात जनतेचे प्रतिनिधीत्व केल्यामुळे त्यांना तुरूंगवासही भोगावा लागला.

१०) श्री. विठ्ठल बन्ने : (१९८७ ते १९८८)

पुज्य सानेगुरूजी व जयप्रकाश नारायण यांच्याकडून प्रेरणा घेवून समाजसेवेत उतरणारे बोलके व अभ्यासू नेतश्त्व म्हणजेच विठ्ठल बन्ने होय. ते मराठीचे प्राध्यापक व भरतीय संस्कृतीचे थोर अभ्यासक होते. आपल्या नगराध्यक्ष पदाच्या कालावधीत त्यांनी भव्य योजना मार्गी लावण्यासाठी अथक प्रयत्न केले. अंध्दश्रध्देने पोखरलेल्या समाजाचे प्रबोधन करण्यासाठी व्याख्याने, संघर्ष व प्रत्यक्ष कश्ती करणारे ते धडाडीचे कार्यकर्ते होते.

११) श्री. शिवाजी खणगावे: (१९८८ ते १९८९)

वरून फणसासारखे ओबडधोबड वाटणारे शिवाजीराव खणगावे हे अंत:करणातून फारच प्रेमळ गश्हस्थ होते. राष्ट्रसेवा दलातील संस्कारामुळे त्यांना लहानपणापासूनच समाजकार्याची आवड निर्माण झाली. समाजातील दिन—दलित, गोर—गरिबांच्या अडचणी दूर करण्यासाठी तन—मन—धन एकत्र करून ते सदैव तयार असत. लक्ष्मी सोसायटी, हिरण्यकेशी दुधसंघ व काळभैरव शिक्षण संस्था यांच्या उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा राहिला. आपल्या सहकाऱ्यांवर

करडी नजर ठेवून काम करून घेणारे नगराध्यक्ष म्हणून ते ओळखले जातात.

**१२) श्री. भिमराव नेवडे: (१९८९ ते १९९१)**

जतीपातीपासून दूर राहून समाजसेवा करणारा निधडया छातीचा कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख होती. जास्त शिक्षण नसतानाही अन्याया विरूध्द पेटून उठणारा तरूण हाच त्यांचा स्वभाव होता. आणिबाणीविरूध्द सत्याग्रह, एस.टी. कामगार संप, हीटणी गावठान वाढ सत्याग्रह प्रसंगी त्यांना तुरूंगवासही सोसावा लागला.

**१३) दत्तात्रय बरगे : (१९९१ ते १९९२)**

स्वकर्तृत्व व कष्टावर पुढे आलेले ग्रहस्थ म्हणजेच दत्तात्रय बरगे होय. उध्वस्थ होवू पाहणाऱ्या कुंभार समाजाची वसाहत उभी करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. शिक्षण कमी पण सामाजिक जाणीव मोठी असणाऱ्या बरगेंनी समाज चळवळीत निष्ठेने सहभाग घेतला.

**१४) श्री. डी. एस. कदम:(१९९२ ते १९९३)**

व्यापारी पार्श्वभूमी असणाऱ्या कदम आण्णांनी सामाजिक शैक्षणिक कार्यात रस घेवून अनेक शैक्षणिक संस्थांना भरघोस मदत केली. त्यापैकी एक प्रमुख संस्था म्हणजे शिवराज कॉलेजला रूपये २ लाखांची उदार देणगी दिली. ते मराठा मंडळ व सामुदायीक विवाह सोहळा योजनेचे संस्थापक, अध्यक्ष असून शिवजयंती उत्सवाच्या आयोजनात नेहमीच अग्रेसर असत.

**१५) श्री. राजन पेडणेकर : (१९९३ ते १९९६)**

वडीलांनी घालून दिलेल्या सामाजिक कार्याचा वारसा त्यांनी समर्थपणे पुढे चालविला आहे. घरची परिस्थिती बेताची असली तरी काबाडकष्ट करून राजकारणात त्यांनी स्वतःचे स्वतंत्र अस्तीत्व निर्माण केले. नगराध्यक्ष पदाच्या कालावधीत पालिकेच्या मुख्य कार्यालयाचे विस्तारीकरण, कोर्ट इमारत उभारणी, भाजी मंडई, सुपर मार्केट, मटण मार्केट, म. दु. श्रेष्ठी आण्णा शाळा, चर्च रोडची बांधणी, स्टॅंड व वाचनालयासमोरील कारंज्या यासारखी महत्वपूर्ण कामे त्यांच्या हातून झाली.

१९९६ नंतर पालिकेच्या नगराध्यक्ष पदावर अनुक्रमे श्री. वसंत यमगेकर (१९९६ ते ९७), श्री. अकबर मुल्ला (१९९७ ते १९९८), सौ. महादेवी नेवडे (१९९८ ते ९९) यांना संधी मिळाली. त्यांचा कार्यकाळ अल्प स्वरूपाचा असल्याने भरीव स्वरूपाचे योगदान देता आले नसले तरी त्यांनी आपापल्या कुवतीप्रमाणे महत्वपूर्ण योगदान दिले. त्यानंतर १९९८ ते २००० या कालावधीत श्री. बापूसाहेब म्हेत्री हे नगराध्यक्ष झाले. त्यांनी दलितांच्या विकासासाठी भरीव योगदान देवून भूमिहीनांच्या घरकुलासाठी चळवळ उभारली. शहरातील भुयारी गटारांचा पहिला टप्पा, संकेश्वर रोड वरील पूल रूंदीकरण, दुकान गाळे, शहरातील रस्ते, गटारांची बांधणी, शाळा व व्यायामशाळा यासारखी महत्वाची कामे पूर्णत्वास नेली. याशिवाय नगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच कबड्डी व फुटबॉलच्या नगराध्यक्ष चषक स्पर्धा घेतल्या.

समारोप :

सुमारे १३२ वर्षापूर्वी स्थापन झालेल्या गडहिंग्लज नगरपालिकेला स्वतंत्र इतिहास y kHky kv kgsnf{k kegkjk'V^khy d kd .kpsiø5k} kj Eg.kw v kS [ kY; kt k.kल्या गडहिंग्लज नगरीचे महत्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे. या नगरीच्या सर्वांगीन विकासामध्ये ज्यांचे ज्यांचे हात लागले त्यामध्ये नगराध्यक्षांचे हात अधिक महत्वपूर्ण ठरतात. डॉ. ए. बी. गुणे यांच्यापासून ते बापूसाहेब म्हेत्री यांच्यापर्यंत लाभलेल्या सर्व नगराध्यक्षांच्या कारकीर्दीत या नगरीच्या विकासाचा आलेख चढतच राहिल्याचे दिसून येते. याच पालिकेने गेल्या ३५ वर्षापासून पूज्य सानेगुरूजी लोकशिक्षण व्याख्यानमालेचे अखंडपणे यशस्वी आयोजन करून महाराष्ट्राला एक वेगळा आदर्श घालून दिला आहे. एकूणच नगराध्यक्षांच्या भरीव योगदानामुळेच राजकिय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक यासारख्या सर्वच दृष्टीकोनातून अधिक परिपूर्ण असल्याने आज गडहिंग्लज ही नगरी प्रत्येकालाच हवी हवीशी वाटते यात तिळमात्र शंका नाही.

## संदर्भ सुची :-


१. सुधाकर गोकाककर (संपादक) 'हिरण्यकेशीच्या काठी', गडहिंग्लज नगरपरिषद गडहिंग्लज शताब्दी स्मृती ग्रंथ (१८८७ ते १९८७), जानेवारी १९८९.

२. सुभाष धुमे, फ्लॅशबॅक, अभिनंदन प्रकाशन कोल्हापूर, २०१५

३. सुभाष कोरे, कर्मयोगी डॉ. एस. एस. घाळी (व्यक्ती आणि कार्य) अक्षरवेध प्रकाशन, गडहिंग्लज, २०१६

४. दैनिक सकाळ गडहिंग्लज कार्यालय वर्धापण दिन विशेषांक, दिनांक ३०/११/२००५.

५. 'हिरण्यमयी' पूज्य सानेगुरूजी मोफत वाचनालय गडहिंग्लज नगरपरिषद आयोजीत मराठी साहित्य संमेलन स्मरणीका २००७.

६. दैनिक किर्तीवंत दिनांक १ ऑक्टोबर २०१७, १ ऑक्टोबर २०१८, १ ऑक्टोबर २०१९.


I/C Principal
Art's, Commerce & Science Mahavidyalaya
Gadhinglaj, Dist. Kolhapur